ग्रामपंचायत निवडणुकांसाठी असलेल्या प्रचाराच्या कालावधीबाबत स्पष्टीकरणात्मक आदेश.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १२ ऑक्टोबर २०१७

## आदेश

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे आदर्श आचारसंहितेसंबंधात निर्गमित केलेले दि.१४ ऑक्टोबर २०१६ रोजीचे आदेश.

राज्य निवडणूक आयोगाकडे ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात प्रचार कालावधीबाबत वारंवार विविध जिल्ह्यांकडून विचारणा होत आहे. यासंदर्भात निदर्शनास आणून देण्यात येते की, आयोगाच्या दि.१४ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या आदर्श आचारसंहितेबाबतच्या एकत्रित आदेशातील भाग-७ मध्ये निवडणुकीच्या प्रक्रियेसंदर्भात नमूद करण्यात आल्या नसलेल्या बाबींसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून निर्देश निर्गमित करण्यात आलेले नसतील, अशा बाबींसंदर्भात आदर्श आचारसंहितेच्या एकत्रित आदेशाच्या पुस्तिकेतील परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या भारत निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेमधील तत्त्वांचे पालन करावे असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

२. त्यानुसार उक्त परिशिष्ट-१ अ मध्ये भारत निवडणूक आयोगाने आदर्श आचारसहितेच्या अंमलबजावणीसंदर्भात उमेदवारांसाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वातील क्र.४ च्या निर्देशामध्ये मतदान संपण्याच्या वेळेपूर्वी ४८ तास अगोदर मतदान क्रेंद्राच्या इमारतीपासून १०० मीटरच्या क्षेत्रामध्ये प्रचारासंदर्भात जाहीर सभा आयोजित करणे. तसेच मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ये-जा करण्यासाठी वाहन सुविधा उपलब्ध करून देणे इ. बाबी कटाक्षाने टाळण्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

तसेच, ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात मर्यादित प्रचार क्षेत्र व प्रभागनिहाय अनेक मतदार केंद्रे असतात, ही बाब लक्षात घेता ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसदर्भात आदर्श आचारसंहिता लागू असलेल्या संपूर्ण क्षेत्रात निवडणुकीसाठी मतदान समाप्तीच्या वेळेपूर्वीच्या ४८ तासांमध्ये उमेदवारांना निवडणुकीचा जाहीर प्रचार करण्यास प्रतिबंधित करण्यात आलेले आहे, असे सर्व संबंधितांच्या पुन्हा निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

Awaiwade
12.10.17
(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
मा. जिल्हाधिकारी (सर्व),
मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून.

प्रत माहितीस्तव:-

१. मा. सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन.
२. मा. विभागीय आयुक्त (सर्व)
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
५. स्थायी आदेश संचिका